***"डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष -२०१५"***


# अधीक्षक अभियंता,
# **कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे**

जलसंपत्ती भवन, कोथरुड, पुणे- ४११ ०३८

दुरध्वनी: ०२०-२५४६८९८२, फॅक्स: ०२०-२५४४५७६३

ई-मेल: sekdc_pune@wrd.maharashtra.gov.in

*जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या:*

http://wrd.maharashtra.gov.in/

महाराष्ट्र शासन

**जलसंपदा विभाग**


**(फक्त ई-मेल दवारे)** जा.क्र.: पी.एम.ओ./D-4/धा-१५४/1452/२०१५ दिनांक:-31/07/2015

प्रति,

मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे
मा. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ, औरंगाबाद
मा. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ
मा. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ
मा. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
मा. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक
मा. महासंचालक, जल व भुमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद
मा. मुख्य अभियंता, जलविदयुत प्रकल्प (स्थापत्य), पुणे
मा. मुख्य अभियंता, जलविदयुत प्रकल्प (विदयुत), मुंबई
मा. मुख्य अभियंता, यांत्रिकी, नाशिक

| | |
|---|---|
| **विषय:-** | **ई सेवा पुस्तक प्रणालीमधील पुढील तीन मोड्युल्स माहिती भरणे करीता उपलब्ध करुन देणेबाबत.** |
| **संदर्भ:** | १) जलसंपदा विभाग, शासन निर्णय प्रशा २०१४ / (२५१/१४)/ लपा-१, दि. ११/११/२०१४<br>२) जलसंपदा विभाग पत्र क्र. ई-प्रशा-2014/(251/14)/लपा-१, दि. २५/०३/२०१५ |

संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता ई-सेवा पुस्तक ही प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे. या अनुषंगाने जलसंपदा विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे करिता ई सेवा पुस्तक प्रणालीमधील पहिले पाच मोड्युल्स (Personal Details, Medical Examination, Police Verification, Family Details आणि Nominee Details) माहिती भरणे करिता दिनांक २५/०३/२०१५ रोजी संदर्भ क्र. २ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्याअंतर्गत विभागातील बहुतांश अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांची माहिती चांगल्याप्रकारे भरलेली आहे. यानिमित्त संबंधितांचे अभिनंदन करण्यात येत आहे. सदर माहितीचे पृथ:करण केले असता महत्वपुर्ण बाबी निदर्शनास आल्या आहेत, त्याचा तपशिल परिशिष्ट क्र. १ मध्ये देण्यात आला आहे. सदर माहितीचा वापर प्रशिक्षणार्थीची निवड करणे, अधिकारी / कर्मचारी यांना SMS / ई-मेल पाठविणे व इतर कामांसाठी करण्यात येत आहे. सदर मोड्युल्स माहिती भरण्यासाठी आतादेखील उपलब्ध आहे, त्यामुळे ज्यांनी माहिती भरलेली नाही, त्यांनी सदर माहिती तातडीने भरावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

आता ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील पुढील ३ मोड्युल्स- **Qualification Details, Past Experience Details व Professional Exam Details** माहिती भरण्याकरिता सर्वांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. जलसंपदा विभागाचे संकेतस्थळावर ई-सेवा पुस्तक या टॅब अंतर्गत https://goo.gl/8jD7ER या लिंकवर सर्व मोड्युल्सचे Video User Manuals उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच प्रणालीमध्ये भरावयाच्या माहितीचे सर्व फिल्ड देखील देण्यात आले आहेत. माहिती भरण्यापुर्वी सदर

व्हिडिओ पहावेत अशी शिफारस करण्यात येत आहे. आपणास विनंती करण्यात येते की आपले अधिनस्त कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांना ई सेवा पुस्तकात दि. ३१ ऑगस्ट २०१५ पुर्वी माहिती भरण्याकरिता आदेशित करण्यात यावे.

सद्यस्थितीत ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये भरलेल्या माहितीनुसार सर्व अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचा वाढदिवस, सेवेत प्रवेश केल्याचा दिनांक आणि सेवा निवृत्तीचा दिनांक अशा दिवशी अभिनंदनाचा SMS पाठविण्यात येत आहे. अशा प्रकारचे ७७०० SMS आतापर्यंत प्रणाली मधुन संबंधितांना पाठविण्यात आलेले आहेत. भविष्यात SMS च्या माध्यमातुन सेवा विषयक इतर बाबी - जसे वेतन, रजा मंजुरी, पदोन्नती, बदली आदी माहिती पाठविणे शक्य आहे. यासाठी संबंधितांनी त्यांचा अचुक मोबाईल क्रमांक तसेच ई-मेल ID व इतर माहिती प्रणालीमध्ये भरणे आवश्यक आहे. तसेच या प्रणालीमधुन प्राप्त माहितीनुसार अधिकारी / कर्मचारी यांचे वाढदिवस व त्यांची सेवानिवृत्ती याबाबतची माहिती जलसंपदा विभागाचे संकेतस्थळ अंतर्गत असलेल्या "जलसंपदा कर्मचारी" या टॅब अंतर्गत लवकरच उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

या प्रणालीचे पुढील मोड्युल्स विकसित करण्यात येत आहे व लकरवच ते उपलब्ध करुन दिले जातील. त्यामध्ये Posting Details या मोड्युल अंतर्गत शासकीय सेवेत रुजु झाल्यापासुन आजतागायतचा सर्व सेवा तपशिल भरण्याची सुविधा असणार आहे. हा सेवा तपशिल पदोन्नती व बदली यासाठी विचारात घेतला जाणार आहे, त्यामुळे तो भरण्यासाठी काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच या मोड्युल मध्ये Current Posting भरावयाची सोय देखील उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. Current Posting मध्ये माहिती भरल्यानंतर सद्यस्थितीत असलेले पद व कार्यालय यांची माहिती अद्ययावत होणार आहे.

सदर प्रणालीमध्ये माहिती भरण्यासाठी लॉगीन होत नसल्यास अथवा पासवर्ड विसरल्यास तो reset करण्याची सुविधा लॉगीन करण्याच्या पृष्ठावरच म्हणजे https://goo.gl/w2k5En या पेजवर उपलब्ध आहे. त्याचा आवश्यकतेनुसार वापर करावा. तसेच या व्यतिरिक्त कोणतीही अडचण असल्यास http://goo.gl/Cy7kbC या ठिकाणी तक्रार नोंदणी करणे, किंवा support@mahaonline.gov.in या ई-मेल द्वारे तक्रार पाठविणे किंवा Mahaonline Help Line 022-61316400 या क्रमांकावर संपर्क साधणे अशा सुविधा उपलब्ध आहे. या माध्यमातुन संबंधितांनी अडचणींचे निराकरण करणे अपेक्षित आहे.

सदर प्रणालीमध्ये अधिकारी / कर्मचारी यांची नोंदणी करतेवेळी काही DDO यांनी संबंधितांचे आधार क्रमांक चुकीचे टाकले असल्याचे निदर्शणास आले आहे. DDO यांनी नोंदणी केलेल्या आधार क्रमांकाची पडताळणी (authentication) UID Authority यांचेमार्फत करण्याचे प्रस्तावित असल्याने हे क्रमांक अचुक असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे आधार क्रमांक चुकीचे भरण्यात आले असतील तर त्यांनी उपरोक्त प्रमाणे नमुद केल्याप्रमाणे महाऑनलाईन यांचेशी संपर्क साधुन ते दुरुस्त करुन घ्यावेत. अशा देखील सुचना संबंधितांना देण्यात याव्यात ही विनंती.

भविष्यात बदली, पदोन्नती, रजा, वेतनवाढ यासारख्या बाबींसाठी ई-सेवा पुस्तक प्रणाली वापरण्यात येणार असल्याने सदर माहिती अचुक राहिल व विहित कालावधीमध्ये सर्व अधिकारी / कर्मचारी यांची माहिती भरण्यात येईल याकडे संबंधित DDO यांनी स्वत: लक्ष घालावे. संदर्भिय शासन निर्णयामध्ये असे स्पष्टपणे नमुद करण्यात आले आहे की, ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये संपुर्ण माहिती भरण्याची कार्यवाही न करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात येऊ नये. त्यामुळे वेतन अदा केले असल्यास, संबंधितांनी माहिती भरली असल्याची खातरजमा करण्याबाबतचे देखील आदेश संबंधितांना द्यावेत, ही विनंती.

या प्रणालीबाबत कोणतीही अडचण असल्यास अथवा काही सुचना करावयाच्या असल्यास प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे येथील श्री. प्रविण कोल्हे, कार्यकारी अभियंता यांचेशी eecm.pmo@wrd.maharashtra.gov.in या ईमेलवर किंवा ०२०-२५४६८९८२ (Extension # ८०१) या दुरध्वनी क्रमांकावर अथवा श्री. नंदकिशोर रणवरे,

सहा. अभियंता-१ यांचेशी ae1trg.pmo@gmail.com या ईमेलवर अथवा ०२०-२५४६८९८२ (Extension # ८०८) या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. ई-सेवा पुस्तक प्रणालीमार्फत सेवा विषयक कार्यपध्दती अधिक सुटसुटित व तत्पर होणार असल्याने या प्रणालीमधील माहिती भरण्याची व त्याची पडताळणी करण्याची कार्यवाहीस गती देण्यात यावी ही विनंती.

सहपत्र:- परिशिष्ट-१

**रा. र. शहा**
**अधीक्षक अभियंता**
कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे

**प्रतिलिपी**:

१) मा. प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर (लक्षवेध: डॉ. संजय बेलसरे, उपसचिव, लपा)
२) मा. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादर
३) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित
४) सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित
५) सर्व DDO यांना आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित

## परिशिष्ट-१

## ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील माहितीचे पृथ:करण

1) **अधिकारी / कर्मचारी यांची महामंडळ निहाय संख्या**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | अधिकारी / कर्मचारी यांची संख्या |
|---|---|---|
| १) | गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ, औरंगाबाद | १०३४९ |
| २) | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे | १०२२९ |
| ३) | विदर्भ सिंचन विकास महामंडळ, नागपुर | ९८७५ |
| ४) | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे | ३१२७ |
| ५) | तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव | २३०२ |
| ६) | महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक | ३६८ |
| ७) | जल व भुमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद | २७५ |
| ८) | जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन | ८६७७ |
| | एकुण = | ४५२०२ |

**टिप: सदर माहितीमध्ये RT व CRT यांचा समावेश आहे . सदर माहिती अंतिम नसुन काही कार्यालयांचे Parent Office mapping झालेले नसल्याने माहितीमध्ये तृटी आढळते. तसेच सर्व अधिकारी / कर्मचारी यांची नोंदणी प्रणालीमध्ये झाल्याबाबतची पडताळणी होणे बाकी आहे. त्यामुळे उपरोक्त माहितीमध्ये बदल होण्याचा संभव आहे.**

2) **जलसंपदा विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्या वयाबाबतचा तपशिल:**
**सरासरी वय: ४८ वर्ष**

